# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य

– डॉ. पांडुरंग भोसले

**प्रास्ताविक :**

संत गाडगे महाराजांचे कार्य त्यांच्या जीवनानुभवांच्या मुशीतून प्रत्ययाला आलेले फलित होते. सावकार बहुसंख्य अडाणी लोकांना आपल्या डावपेचांनी पिळून काढीत होते. पैसे किती दिले, किती राहिले याचा हिशेब कोणी पाहत नव्हते. सावकारांवर विश्वास होता आणि ते त्यांच्या विश्वासाचा गैरफायदा ऊठवत होते. शेतकरी वा अन्य कोणीही एकदा सावकाराकडे गेला की, पुन्हा त्याची अजगराच्या या विळख्यातून सुटका नाही. त्याची सगळी मिळकत त्याच्या घशात गेलीच अशी स्थिती होती.

संत गाडगे महाराजांच्या लग्नासाठी चंद्रभान मामाने कर्ज काढले. शेतीतून निघणारे बहुतांशी उत्पन्न सतत सावकाराला देऊनही त्याचे कर्ज फिटत नव्हते. सणवार बंद केले, अंगावरील कपडे कमी केले. या सर्वांचा परिणाम होऊन मामाने हाय खाल्ली आणि आजारी पडून प्राण सोडला. मामाचा मृत्यू कर्जापोटीच झाल्याची त्यांची खात्री झाली. वडीलही त्यातच गेले. दारूचे व्यसन, मांसाहार आणि सावकाराचे कर्ज या गोष्टी त्यांना भयंकर वाटू लागल्या. सावकाराशी टक्कर देऊन त्यांनी आपला प्रश्न सोडवला, पण समाजातील अशा हजारो लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची गरज त्यांना वाटू लागली आणि एक दिवस मनाचा निश्चय करून ते घराबाहेर पडले, परत घराकडे न येण्यासाठी.

घर सोडल्यानंतर गावोगाव भटकत राहिले. कुठे जायचे निश्चित नाही. काय करायचे ठरले नाही, कुठे जेवायचे, कुठे विसावा घ्यायचा याचा पत्ता नाही. कुणाच्या घरी थांबायचे, भाकरी मागायची, आडोशाला बसून खायचे, मडक्यात पाणी घेऊन प्यायचे. खराटा मागून अंगण साफ करायचे, पुढे चालत राहायचे. अंधार पडला की, पडके देऊळ पाहून अंग टाकायचे. सकाळी ऊठून पुन्हा तीच दिनचर्या. कुणी खुरपत असेल तर खुरपू लागत. कोणी मोट हाकीत असेल तर, ' ही महाराची विहीर का ?' असे म्हणून ओंजळीने पाणी पीत.

पंढरपूरसारख्या तीर्थक्षेत्री विठ्ठल मंदिरात बडव्यांचा लोभीपणा पाहिला. भक्तांना दर्शनास पुरेसा वेळ न देता हाकलून देण्याची वृत्ती पाहिली. गावात

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI

भिकारी, अंध, कुष्ठरोगी, गोरगरीब, अस्पृश्य, श्रीमंत हे सर्व पाहिल्यावर 'जग म्हणजे काय, परमेश्वराची लीला काय आहे कळेना.' देव-देवतांपुढे कोण नैवेद्य ठेवतो, कोण बकरी मारतो, कोण कोंबडे मारतो, कोण नारळ फोडतो, कोण फुले वाहतो, पुजेचे हे प्रकार पाहून त्यांच्या मनात विचार येतो की, देवाच्या नावाने हे काय चालले आहे ! आपण आतापर्यंत कीर्तनात, भजनात ह्व

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।<br>
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

हे ऐकले त्याचे काय ?

देव तीर्थात नाही. दीनह्वदुबळ्यांच्या सेवेत आहे आणि त्या कारणीच आपले शरीर झीजविण्याचा निश्चय त्यांनी केला. ऋणमोचणास कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनास प्रारंभ केला. ते आपल्या कीर्तनातून सांगत की, काहीही करा पण सावकाराच्या दारी जाऊ नका, कर्ज काढून तीर्थाला जाऊ नका, गायी, बैल, म्हैस यांना वेळेवर चारापाणी द्या. मारू नका. त्यांच्यावर दया करा. घरी आलेल्या भिकाऱ्याला हाकलून लावू नका, भुकेलेल्यांना अन्न द्या, शिवाशिव पाळू नका, सत्याने वागा, मांत्रिकाच्या नादी लागू नका, मुलांना शिक्षण द्या.

लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य हेच त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. ज्ञानेश्वर, तुकारामादी संतांचा विचार त्यांच्या रोमारोमात भिनला होता. त्यांच्या लेखनातील दाखले ते देत. उक्ती आणि कृती यांची फारकत त्यांनी कधीही होऊ दिली नाही. आधी केले मग सांगितले ही त्यांची विचारधारा होती. ते बोलके सुधारक नव्हते, कर्ते सुधारक होते याची प्रचिती पदोपदी येते.

एकतारी,टाळ नसेल तर दोन दगड घेत आणि धर्मातील साधा विचार रंगवून सांगत.नक्कल करुन लोकांच्या गळी उतरवत.कीर्तनानंतर प्रसाद देण्याची व्यवस्था असे.पंगती ऊठल्या की,पत्रावळी उचलीत.खराटा घेऊन झाडून काढीत.खराटयाचा हा बादशहा दिवसा गावातील  साफ करी आणि संध्याकाळी लोकांच्या डोक्यातील घाण कीर्तनाने साफ करी. अखंड सेवेचा हा वसा सुमारे अर्ध शतक चंदनासारखा जपला.

एकोणिसाव्या शतकात शूद्रातिशुद्रांच्या दास्यमुक्तीसाठी महात्मा फुले जीवनभर झटले तेच कार्य बाबांनी पुढे चालविले.एकूणच काय राजर्षी छत्रपती शाहू, डॉ.बाबसाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, म.गांधी, बाबा आमटे यांचा वसा आणि वारसा त्यांनी पुढे चालविला.

जन्सामान्यांना सज्जन बनवावे, सज्जनांना साधू बनवावे,  साधकांना सेवक बनवावे,सेवकांना सुधारक बनवावे हा बाबांच्या जीवन कार्याचा हेतू होता.सत्याचा शोध,समाजाची सुधारणा आणि समाजपरिवर्तन या क्रमाने बदलाचा ध्यास घेतलेले

आणि कार्यप्रवण राहिलेले बाबा एक युगपुरुष होते.

पददलितांच्या, शोषितांच्या, गरिबांच्या सुखासाठी त्यांनी आपले सारसर्वस्व अर्पण केले.करुणा आणि दयेने त्यांचे अंतःकरण ओथंबलेले होते. जणांचा त्याना कळवळा होता म्हणूनच ते औत हाकित,खुरपू लागत,पीक काढीत,कापूस वेचू लागत,लाकडे फोडत,रस्ते झाडीत,रोग्यांची सेवा करीत; म्हणूनच दडपल्या गेलेल्या, पिडलेल्या, चिरडल्या जात असलेल्या दुर्बलांना, दीनांना बाबा आधारस्तंभ वाटत.

प्रेम, सेवा, स्वच्छता, त्याग, नम्रता, बंधुभाव आणि समता ही बाबांच्या कार्याची केंद्रस्थाने होती.माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे हीच विचारधारा त्या विचारतत्त्वांच्या मुळाशी होती.माणसाच्या अधोगतीला त्याचे अज्ञान आहे हेच कारणीभूत आहे हे त्यांना मनोमन पटले होते आणि म्हणून शिक्षणावर भर देण्यासाठी ते सतत आवाहन करीत असत.ज्याला विद्या नाही त्याला खटाऱ्याचा बैल समजा ससे ते म्हणत असत. मुलांना शिक्षण द्या.पैसे नाही म्हणाल तर जेवनाचं ताट मोडा.हातावर भाकरी खा,बायकोचं लुगडं कमी भावाचं घ्या,इव्हायाला पाहुणचार करू नका पण मुलांना शाळेत घाला असे कळकळीने सांगत.

वर्गव्यवस्था आणि जातिव्यवस्था याविषयी कमालीची चिड त्यांच्या मनात होती.सोयीनुसार जातिव्यवस्था शाबूत ठेवू इच्छिणाऱ्यांवर ते कडाडून हल्ला करतात.मोटारीत बसल्यावर मोटार बाटत नाही,तिला शिवाशिव होत नाही आणि अस्पृश्याने एखादे भांडे घेतले की,ते तापवून शुद्ध करून घेता मग एखादा माणूस बाटतो तेव्हा त्यालाही तसाच शुद्ध करून घ्या,त्याच्या अंगावर गवत टाका अन् द्या आगपेटी लावून.या जगात फक्त दोनच जाती आहेत आणि त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष.त्याव्यतिरिक्त भेदाभेद करू नका हाच सल्ला बाबा देत असत.

नाडल्या गेलेल्या, पिडल्या गेलेल्या, गरज असलेल्या अशा लोकांसाठी गाडगेबाबांनी विविध संस्था स्थापन केल्या. नाशिक, पंढरपूर, पुणे, सोलापूर, देहू, ब्रह्मपुरी, मुंबई, राहुरी, वरवंडी, मूर्तिजापूर, ऋणमोचन, आमला,

उमरी,अचलपूर,संभू-सावरगाव,दोनद,अमरावती,जळगाव अशा विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार धर्मशाळा, प्रसुतिगृह, अंध-पंगू सदावर्त, कुष्ठधाम, हरिजन बोर्डिंग,वाचनालय,मराठा धर्मशाळा,प्रकाशन समिती,मासिक कार्यालय, प्रिंटिंग प्रेस, आदिवासी आश्रमशाळा, गोरक्षण, बालमंदिर, अनाथ विद्यार्थी वसतिगृह अशा विविध संथा स्थापन केल्या.

**समारोप –**

आपल्या समग्र जीवन-कार्यातून बहुजनोद्धारक अशी कार्यप्रणाली अवलंबिणाऱ्या बाबांनी उक्ती आणि कृतीतून जो संदेश दिला त्याचे सार पुढीलप्रमाणे

ह्नजनतेची सेवा करा,गरिबांवर दया करा,त्यांना मदत करा,भुकेलेल्यांना अन्न द्या,हुंडा देऊ-घेऊ नका,कर्ज काढू नका,कर्ज काढून कोणतीही गोष्ट करू नका,श्रमाला महत्त्व द्या,शिवाशिव पाळू नका,अंध-अपंग-कुष्ठरोगी यांची सेवा करा,प्रसंगी घरातील भांडी विका पण मुलांना शिक्षण द्या,देव-देवतांना बळी देऊ नका,जनावरांवर प्रेम करा,या जगात फक्त दोनच जाती आहेत त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष.तेव्हा मानवावर प्रेम करा आणि मानवाची सेवा करा यातच ईश्वराची सेवा आहे.

अखेरी संत गाडगे महाराजांविषयी असे म्हणता येईल,

कण कण करुनी कोटी केले ।
कण न खर्चता स्वहितासाठी ।।
वण वण फिरुनी कण कण झिजले ।
बाबा दुःखी जनतेसाठी ।।

MAHATMA PHULE MAHA... PIMPRI PUNE 17